॥ श्री ॥

कशेळी गांवाचे गाणे

कशेळी गांव आहे त्रिकोण । गांवाभोवती सागर वेष्ठन ।
कनकादित्याचे देऊळ छान । तटस्थ होती पहाणारे जन ।
ऐक गे ऐक मैत्रिणी बाई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ १॥

गावाचा वस्त तीन हजार । कऱ्हाडे सर्व कुणबवेदार ।
वाणी तेली कुणबी न्हावी सोनार । महार भंडारी शिंपी सुतार ।
वेशींचे घर एकच बाई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ २॥

मुख्य उत्पन्न भाते मळ्याची । नारळीची झाडे अंगे ओलाची ।
मळ्याभोवती वस्ती सर्वांची । पाण्याची सोय आहे विहीरीची ।
उद्यमाने सारी शेतकी होई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ ३॥

खानेसुमारी एकवीसशे होत । फौजदार भागवत अँताजी पंत ।
तलाठी कोतवाल समस्त । आल्या गेल्याचे करिती अतिथ्य ।
खाडीस बांध दुकान सोई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ ४॥

उपनांवे आता देते सांगून । नाटेकर सर्व उपाध्ये जाण ।
दत्ते भागवत राऊत महाजन । गुर्जर जोशी पाध्ये ही खूण ।
आवळकर खोती ग बाई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ ५॥

शेजवलकर जायदे ओर्डे ओळकर । किराणे सावरे कुळकर्णी घर ।
कशेळकर नाफडे कळके धाऊस्त । देसाई ठाकुर हर्डीकर खास ।
हरिदास मानी आहेत गोसावी । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ ६॥

माघ पंचमीस ब्राह्मण भोजन । षष्ठीचे दिवशी करिती कुळधर्म ।
मध्यरात्रीला काळकाई येई । कनकोबा जवळ जाऊन राही ।
माघ सप्तमी उत्सव आला । घोडे आणुनी रथ जुंपिला ।
नारींचा थवा पुजे निघाला । हळदीकुंकू आणि देती तिळगुळा ।
मुलांची दाटी दुकानी होई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ ७॥

रथ सप्तमी सांगते आता । कनकोबाच्या उत्सव आनंददाता ।
उत्सवाची रीत फारच सुंदर । बंदोबस्तासाठी असती फौजदार ।
आल्या गेल्याचा सपाटा फार । जयजयकार करूनी गर्जती भालदार ।
रात्री नवाला पुराण होई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ ८॥

नंतर गाणे वरी मंत्रपुष्प । आरत्या गाती प्रेमळ भक्त ।
पालखी उचलती दत्ते भागवत । तासे वाजंत्री नेती मिरवत ।
नटवा नाचता दारी ग बाई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ ९ ॥

भोवती उपरी तमाशा वरी । हरीदास उभा कीर्तन करी ।
चार दिवस सोहाळे भारी । दशमीचे दिवशी सुरते वारी ।
ऐक गे ऐक मैत्रिणी बाई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ १० ॥

एकादशी दिवशी होई ललीत । द्वादशी दिवशी तीर्थ प्रसाद ।
नारी नरांना आनंद झाला । साखर वाटूनी जाती घराला ।
ऐक गे ऐक मैत्रिणी बाई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ ११ ॥

होळीका उत्सव साजरा होई । डफ मृदुंग गर्जत राही ।
सर्व गावात चैतन्य येई । रंग पंचमी शिंपणे होई ।
पाडव्या दिवशी गोड नैवेद्य । अर्पण होती देवाला बाई ।
ऐक गे ऐक मैत्रिणी बाई । कशेळी जाऊन कनकोबा पाही ॥ १२ ॥